


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ    Mob- 9822720784    Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : ७५५. वा | सोमवार | दि. २९ एप्रिल २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# जिल्हा रुग्णालयालयाला पोखरणारे भ्रष्टाचारी अद्यापही मोकाटच

## कारवाई करण्यासंदर्भात तक्रारकर्त्यांचे लोकायुक्तांना साकडे...

**पोस्टमार्टम ७३**

**जनसंचलन/बुलढाणा**

गेल्या काही वर्षांमध्ये येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात औषधी व साहित्य उपकरणांच्या खरेदीत जो काही अनिर्बंध भ्रष्टाचार तसेच विविध प्रकारच्या खरेदीत अनियमितता झाली, ती सर्व चौकशी समितीच्या समोर आलेली आहे. चौकशी समितीची आता पूर्ण खात्री झाली की, यात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार व भ्रष्टाचार झालेला आहे. या स्थितीतही जिल्हा रुग्णालयाला पोखरणारे हे भ्रष्टाचारी अधिकारी अद्यापही मोकाट असून, त्यांच्यावर कसल्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे येथे भ्रष्टाचाराला खतपाणी मिळत आहे. या स्थितीत येथील भ्रष्टाचाऱ्यांवर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी तक्रारकर्ते चंद्रकांत खरात यांनी मुंबईच्या विद्यमान लोकायुक्तांकडे केली होती. यासंदर्भात अद्यापही कुठलीही हालचाल झाली नसल्याने यासंदर्भात खरात व विशेष विविध सामाजिक संघटनांनी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या वतीने गेल्या अनेक महिन्यांपासून जिल्हा रुग्णालयात बोकाळलेली अनागोंदी व येथे उफाळलेला प्रचंड भ्रष्टाचार यासंदर्भात सातत्याने आवाज उठवण्याचे काम करीत आहे. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या वाचकांना माहिती आहे की, यासंदर्भात आम्ही पुराव्यांनिशी वृत्तमालिका प्रकाशित करीत आहोत. जिल्हा सामान्य रुग्णालयात गेल्या काही वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणात औषधी तसेच रुग्णांसाठी महत्वाच्या अशा अनेक प्रकारच्या करोडो रुपयांची उपकरणांची मोठ्या प्रमाणात खरेदी करण्यात आली होती. ही खरेदी प्रक्रिया राबवताना भयंकर अशी अनियमितता करण्यात आली. तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक म्हणजे डॉ. पंडित व डॉ.तडस यांच्यासह तत्कालीन भांडारपाल प्रकाश नामदेव बोथे, तत्कालीन रोखपाल पी. के. माळी आणि काही प्रभारी जिल्हा शल्यचिकित्सक आणि वैद्यकीय अधीक्षक यामध्ये मोठ्या प्रमाणात सहभागी आहेत. या सर्वांनी जिल्हा रुग्णालयात संघटितपणे भ्रष्टाचाराला खतपाणी घातले. जी काही करोडो रुपयांचे साहित्य व औषधी खरेदी करण्यात आली, त्यातील बरीचशी उपकरणे व औषधी ही कधीही जिल्हा रुग्णालयात पोहोचलीच नाही. परंतु त्यांची बिले मात्र सर्रासपणे काढण्यात आली. मोठ्या प्रमाणात चढ्या दराने बिले अदा करण्यात आली. यातून शासनाला कोट्यवधी रुपयांचा चुना लागला आहे. रोखपाल पी. के. माळी हे तर भ्रष्टाचाराचे शिरोमणीच ठरले. माळी यांनी तर थेट कॅशबुकात प्रचंड खाडाखोड केली आणि मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केला. या सर्व भ्रष्टाचारांना गेल्या काही वर्षांत आलेले जिल्हा शल्यचिकित्क व इतर अधिकारीही भयंकर दोषी आहेत. यासंदर्भात जेंव्हा सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन तसेच काही विशेष सामाजिक संघटनांनी आवाज उठवला, तेंव्हा या भ्रष्टाचारासंदर्भात चौकशी समितीद्वारे चौकशी करण्यात आली. काही महिन्यांपूर्वी लेखा व लेखापरीक्षण विभागाच्या संचालकांकडूनही या घोटाळ्यासंदर्भात चौकशी करण्यात आली. परंतु केवळ चौकशांचा फार्स सुरू आहे. भ्रष्टाचारी मात्र आजही करोडो रुपयांचा भ्रष्टाचार करून अपसंपदा जमवून ही मोकाट आहेत. जिल्हा रुग्णालयात त्यांच्या भ्रष्टाचाराचे पाढे बोलल्या जात आहे.तक्रारकर्ते चंद्रकांत खरात यांचे म्हणणे आहे की, यासंदर्भात वारंवार पुराव्यासह तक्रार करूनही कारवाई होत नसल्यामुळेच आता थेट लोकायुक्तांकडे धाव घेण्यात आली आहे. लोकायुक्तांनी आपल्या विनंतीला मान देऊन १२ (३) मध्ये असलेल्या तरतुदींनुसार चौकशी करावी, तसेच यामध्ये ज्यांनी-ज्यांनी भ्रष्टाचार करून स्वतःच्या करोडो रुपयांनी तुंबड्या भरल्या, तसेच स्वतःच्या व नातेवाईकांच्या नावे अवैध संपत्ती / अपसंपदा गोळा केल्या, त्या सर्वांच्या विरोधात फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे निर्देश पोलिस महासंचालक मुंबई यांना द्यावेत व या भ्रष्टाचाऱ्यांना कठोर शिक्षा करावी. याशिवाय जिल्हा रुग्णालयात चाललेला भ्रष्टाचार थांबणार नाही. हा भ्रष्टाचार असाच सुरू राहिल्यास बुलढाण्यातील सामान्य रुग्णालय प्रशासनाची एक दिवशी पुरती वाताहत होईल व सर्वसामान्यांना आरोग्य देणारी यंत्रणा ही नष्ट होईल. त्यामुळे यासंदर्भात तात्काळ कारवाई करावी.असे न झाल्यास लवकरच या भ्रष्टाचाऱ्या विरोधात उपोषणासारखे लोकशाही मार्गाने आंदोलन केले जाईल. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन देखील सातत्याने या मुद्याचा परामर्श घेऊन आपली वृत्तमालिका प्रकाशित करीतच राहणार आहे. जोपर्यंत जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचाऱ्यांना गजाआड केले जात नाही, तोपर्यंत ही मोहीम अविरतपणे सुरूच राहणार आहे.

**अजून बरेच काही पुढील भागात...**

### दोन राजकीय दिग्गजांच्या तक्रारींवर कारवाई का होत नाही ?

**बुलडाणा आमदार संजय गायकवाड यांनी झालेल्या अधिवेशनात जिल्हा सामान्य रुग्णालय करोडो रुपयांचा भ्रष्टाचार विषयी तारांकित प्रश्न मांडूनही शासनाकडून कारवाई गुलदस्त्यात ? तसेच भाजपा प्रवक्ते विनोद वाघ यांनी मुंबई,पुणे,नागपूर,अमरावती व अकोला पर्यंत तक्रारी व बुलडाण्यात आंदोलनाची पत्रे देऊनही कारवाई शून्य या दोन्ही लोकप्रतिनिधींच्या तक्रारीला आरोग्य प्रशासन व भ्रष्टाचारी काहीच जुमानत नसल्याची जिल्हा सामान्य रुग्णालयात चर्चेला पेव फुटले आहे?**




---

# डिजेच्या आवाजाने मधमाशानी केली वराडीमंडळीवर हल्ला

## १० जणांवर जिल्हा सामान्य रूग्णालयात उपचार सुरू...

**जनसंचलन/ लोणार**

डिजे वाजविणे चांगलेच अगलट आले आहे.बुलढाणा शहरात अशी धक्कादायक घटना दि २८ एप्रिल रोजी सांयकाळी घडली आहे.जाभरूण रोडवरील मुट्टे यांच्या घराजवळ एक लग्न होते. त्या लग्नामध्ये डिजे वाजत होता. एक झाडावर असलेल्या आग्यामवळाच्या माश्याला त्यांचा प्रचंड त्रास झाला आणि त्यांनी त्यांच्या हल्लाबोल केला आहे. सविस्तर वृत असे की,डिजेचा आवाज खुप मोठ्या प्रमाणात असल्याने त्यांचा आग्यामवळाच्या माशाला त्रास झाला आणि त्या चिंगळ्या डिजेच्या थरावर नाचत असलेल्या वराडीमंडळावर त्यांनी हल्ला केला आहे.या हल्यामुळे सर्व पळापळ झाली आहे. यामध्ये १० जण जखमी झाले आहे. त्यांना जिल्हा सामान्य रूग्णालय येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.त्यांच्या सध्या उपचार सुरु आहे.यामध्ये अवंती वावळे,रमाबाई जाधव,मायाबाई झिने, सौरभ हिवाळे, सागर जाधव, बबन जाधव, पंकज गवई, राजू गवई, राजू वाहुळे, सुभाष गवळी माया जाधव यांच्यावर जिल्हा सामन्य रूग्णालयात उपचार सुरू आहे.



# नवरदेवाला तलवार घेऊन नाचणे भोवले,गुन्हा दाखल

**जनसंचलन/ संग्रामपूर**

शनिवारी रात्री लग्नाच्या वरातीत टुनकी येथे नवरदेवाला हातात तलवार घेऊन डीजे वाद्याच्या गाण्यावर ताल धरणे चांगलेच भोवले. रविवारी सोनाळा पोलिस ठाण्यात नवरदेवावर गुन्हा दाखल करण्यात आला. संग्रामपूर तालुक्यातील टुनकी येथे शनिवारी रात्री नवरदेवाची मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत सार्वजनिक ठिकाणी सचिन सुरेश कोष्टी हा नवरदेव हातात तलवार घेऊन डीजेच्या तालावर नाचत असताना दोन गटांत वाद निर्माण झाला. यावेळी वरातीवर दगडफेक करण्यात आल्याने गावात तणाव निर्माण झाला. या नवरदेवाने तलवार हवेत फिरवून कायद्याचे उल्लंघन केले आहे. याप्रकरणी विनोद शिंबरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सचिन सुरेश कोष्टीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# दिव्यांगाने बजावला मतदानाचा अधिकार

**जनसंचलन/ सिंदखेड राजा**



तालुक्यातील रूम्हना येथे लोकसभेच्या मतदानाची प्रक्रिया शांततेत पार पडली, रुमना येथे एकच मतदान केंद्र होते त्यामुळे येथे ७० टक्के मतदान झाले, अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात गावकऱ्यांनी लोकशाहीचा उत्सव साजरा केला तर मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी मतदान केंद्रावर थंड पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती, आलेल्या कर्मचाऱ्यांसाठी चहा, नाश्ता, जेवणाची व्यवस्था ग्रामपंचायत कडून करण्यात आली होती, यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी शिक्षक संपत गलबे, तलाठी नागरे, ग्रामसेवक विनोद सातपुते, ग्रामपंचायत कर्मचारी प्रकाश जायभाये, हरिभाऊ जायभाये, अंगणवाडी सेविका लता कायंदे, नीता डोळे, मालता काळे, यांनी सहकार्य केले, मतदान केंद्रावर दिव्यांगाच्या खुर्चीचा आधार घेत, दिव्यांग वयोवृद्ध नागरिकांनी सुद्धा मतदानाचा अधिकार बजावला.

# दुचाकीचा अपघात मुलगा जागीच ठार तर पिता गंभीर जखमी...

**जनसंचलन/मलकापूर**

दुचाकीच्या जबर अपघातात मुलाचा जागीच मृत्यू झाला तर पित्याला अत्यवस्थेत रुग्णालयात हलविण्यात आले. राष्ट्रीय महामार्ग ५३ वर मौजे धरणगाव ओव्हर ब्रीजनजीक रविवारी सकाळी ९ वाजताच्या सुमारास ही घटना घडली. तालुक्यातील तालसवाडा येथील रहिवासी सुपडा श्रीहरी घाईट (५०), त्यांचा मुलगा अजय सुपडा घाईट (२२) हे दोघे दुचाकी क्रमांक एमएच-२८, बीपी-८७५४ ने गावातून सकाळी ८:३० वाजताच्या सुमारास घराबाहेर पडले राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ चे चौपदरीकरण झाले आहे. मात्र, अजूनही बऱ्याच ठिकाणी काम अपूर्ण आहे. रस्त्याची ठिकठिकाणी डागडुजी व दुरुस्ती सुरू आहे. त्या-त्या ठिकाणी दिशादर्शकाचा अभाव आहे. नेमकी हीच बाब अपघातास कारणीभूत ठरत असल्याचा दावा घटनास्थळी ग्रामस्थांनी केला आहे. होती. पितापुत्र दुचाकीने मलकापूरकडे येत होते. सकाळी ९ वाजताच्या सुमारास तालुक्यातील धरणगाव ओव्हर ब्रीजनजीक खड्ड्यातून दुचाकी उसळली ती डिवायडरवर जाऊन आदळली. या अपघातात डीवायडरचा जबर मार डोक्याला लागल्याने अजय




घाईटचा जागीच मृत्यू झाला. तर सुपडा घाईट गंभीररीत्या जखमी होऊन बेशुद्ध पडले. माहिती कळताच धरणगाव येथील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी जखमीला उपचारासाठी खाजगी रुग्णालयात हलविले. सुपडा घाईट यांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचे डॉ. चेतन जाधव यांनी सांगितले.

# विवाहितेवर अत्याचार केल्याप्रकरणी युवकावर गुन्हा दाखल

**जनसंचलन/ शेगाव**

सोशल मीडियाच्या माध्यमातून युवकाने विवाहित महिलेशी प्रेमसंबंध स्थापन केले. प्रेमाच्या आणाभाका देत लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर सातत्याने अत्याचार केला. याप्रकरणी शोषण केल्याच्या तक्रारीवरून युवकावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. याबाबत ३२ वर्षीय पीडितेने शहर पोलिसांत तक्रार दिली. त्यामध्ये जून २०२३ ते २२ एप्रिल २०२४ पर्यंत समीरशहा अनिसशहा (३२ वर्षे, रा. ईदगाह प्लॉट, शादी हॉल जवळ) याने वारंवार इच्छेविरुद्ध अत्याचार केल्याचे म्हटले आहे. त्याच्यासोबत सोशल मीडियावरून ओळख झाल्याने चॅटिंग करीत होते. आरोपीने प्रेम असल्याचे सांगून लग्न करायचे आहे, असे म्हणून भेटण्यास बोलावले. इच्छेविरुद्ध शारीरिक संबंध केले, पतीला याबाबत माहिती मिळाल्याने त्याने मला खामगाव येथे राहण्यास घेऊन गेला. तेथेही आरोपीने व्हिडीओ व फोटो व्हायरल करण्याची तसेच पतीला जिवाने मारण्याची धमकी देत संबंध प्रस्थापित केले. त्यावरून गुन्हा दाखल करण्यात आला.

# दोन दुचाकीची समोरासमोर धडक एक जण ठार

**जनसंचलन/बुलढाणा**

दोन दुचाकीची समोरासमोर धडक झाल्याने झालेल्या अपघातात एक जण जागीच ठार झाला आहे.हि घटना दि २८ एप्रिल रोजी सायकांळी ६.३० वाजेच्या सुमारास साखळी फाट्याजवळ घडली आहे. शुभम अशोक पाटील वय ३० रा.शाहू नगर बुलढाणा असे अपघात ठार झालेल्या तरूणाचे नाव आहे. सविस्तर वृत असे की शुभम हा नेहमी प्रमाणे दुध संकलन करण्याचे काम करत होता. साखळी येथे तो रोज दुध वाटप करत असे. २८ एप्रिल रोजी नेहमी प्रमाणे तो आपल्या मोटारसायकल क्रमांक एम एच २८क्यू २३८५ गाडीने साखळी येथे दुध वाटप करून




घराकडे परत येत असताना समोर येणाऱ्या दुचाकी क्रमांक एम.एच.२८ यू ९१२१ या गाडीने शुभम यांच्या गाडीला समोरून धडक दिली यामध्ये शुभम यांच्या डोक्याला व छातीला जबरदस्त मार लागला.त्यामुळे शुभम याला उपचारासाठी जिल्हा सामान्य रूग्णालय येथे उपचारासाठी दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले आहे.आरोपीविरूध्द बुलढाणा ग्रामीण पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| गुंतवणुक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ७.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.५०% | ७.५०% |
| ३ | १८१ दिवस ते १६ महिने | | ८.००% | ८.००% |
| ४ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ७.००% |
| ५ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ६ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |
| ७ | सुकन्या लक्षाधिश ठेव योजना | | ८.७०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर ०.२५% टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा...
सुकन्या
लक्षाधीश ठेव योजना



गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४


The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# विनापरवानगी डीजे वाजविल्यास आता पोलिस करणार कठोर कारवाई...

## बुलढाणा शहर पोलिसस्टेशन येथे सर्व समाजबांधव यांची शांतता कमिटीची बैठक संपन्न

जनसंचलन/बुलढाणा



सद्यस्थितीत लग्न सराईची धूम सुरू असल्याने त्यात विनापरवाना डीजे वाजविण्यात येत आहेत. आगामी काळात लग्न व ईतर मिरवणुकीत विनापरवाना डीजे वाजविल्यास कठोर कारवाईचा इशारा बुलढाणा शहर पोलिस स्टेशनचे पोलिस निरिक्षक श्री ठाकरे यांनी दिला आहे.दि .२८ एप्रिल रोजी बुलढाणा शहर पोलिस स्टेशन येथे सर्व समाजबांधावाची बैठक घेण्यात आली आहे.या मध्ये हा निर्णय घेण्यात आला आहे. जिल्हा पोलिस अधिक्षक श्री सुनिल कडासने यांच्या मार्गदर्शनाखाली हि मोहिम सुरू करण्यात आली आहे. लग्न आणि वरातीच्या मिरवणुकीत संवेदनशील ठिकाणी विनाकारण थांबवून कर्कश आवाजात डीजेच्या वाद्यावर आक्षेपार्ह गाणे वाजविल्या जात आहेत. त्यामुळे दोन समाजामध्ये वाद निर्माण होऊन कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे.मिरवणूक मध्ये सुध्दा मोठ्या प्रमाणात डिजे वाजविले जात आहे.बुलढाणा शहरात गेल्या १४ एप्रिल रोजी मोठी घटना घडली आहे. एक तरूणाची निघृण हत्या करण्यात आली आहे.डिजे आला म्हणजे दारू आली आणि नशेत काय करतील हे काही सांगता येत नाही त्यामुळे या गोष्टीला कुठे तरी आळा बसायला हवा. त्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.लग्न समारंभात डिजे वाजविण्यासाठी तसेच जयंती मध्ये डिजे वाजविण्यासाठी आता बुलढाणा शहर पोलिस स्टेशन येथू परवानगी काढण्यात येणार आहे. विनापरवानगी कोणी डिजे वाजविल्यास त्याच्या कठोर कारवाई होणार आहे. त्या अनुषंगाने लग्न, वरात तसेच इतर कोणत्याही मिरवणुकीत कुणीही विनापरवाना डीजे वाद्यांचा वापर करू नये, असे आवाहन बुलढाणा शहर पोलिस स्टेशनचे ठाणेदार श्री ठाकरे यांनी केले आहे. या बैठकला बुलढाणा शहरातील सर्व समाज बांधव उपस्थितीत होते.

# रेतीची अवैध वाहतूक करणारा ट्रक केला जप्त...

## निवडणुकीनंतर प्रशासन ॲक्शन मोडवर

जनसंचलन/मेहकर



लोकसभा निवडणुकीमध्ये प्रशासन व्यस्त असल्याने वाळू माफिया मेहकर तालुक्यात सुसाट झाले होते. अवैध रेतीची वाहतूक करणारा ट्रक तहसीलदार नीलेश मडके यांच्या पथकाने जप्त केला. या ट्रकमध्ये सहा ब्रास रेती आढळून आली आहे. हा ट्रक मेहकर पोलिस स्टेशनला लावण्यात आला आहे. मेहकर तालुक्यात गत काही दिवसांपासून नदीपात्रातून रेतीचा उपसा करून वाहतूक सुरू आहे. महसूल प्रशासन लोकसभा निवडणुकीच्या कामात गुंतलेले असल्याने रेती माफियांसाठी रान मोकळे झाले होते निवडणुकीचा ताण संपताच तहसीलदार नीलेश मडके यांच्या पथकाने जानेफळ रस्त्यावर रेतीची अवैध वाहतूक करणारा ट्रक क्रमांक एम.एच. २१, बीएच ७२५६ पकडला. या टकमध्ये सहा बास रेती होती. तलाठी मस्के मेहकर ते तलाठी ठाकरे यांनी पंचनामा केला. या ट्रकचा मालक राजू ढवळे शारा, ट्रक चालक जयपाल राठोड यांच्यावर कारवाई केली. ट्रक हा मेहकर पोलिस स्टेशनमध्ये लावण्यात आला आहे.मेहकर तालुक्यात गत काही दिवसांपासून रेतीचे उत्खनन करून मोठ्या प्रमाणात वाहतूक करण्यात येत आहे. रेतीने भरलेले ट्रक भरधाव जात असल्याने आतापर्यंत अनेक अपघात घडले आहेत. ही अवैध रेतीची वाहतूक जीवघेणी ठरत आहे. त्यामुळे, रेतीची अवैध वाहतूक थांबवण्यासाठी महसूल तथा पोलिस विभागाने लक्ष देण्याची गरज आहे. मेहकर तालुक्यात महसूल प्रशासन निवडणूकीच्या कामात गुंतलेले असल्याने रेती माफीयांनी हैदोस घातला होता

# दोन गटात तुफान दगडफेक, ४१ जणांवर गुन्हे दाखल



जनसंचलन/ संग्रामपूर

लग्नाच्या वरातील नाचत असताना दोन गटात तणाव निर्माण झाल्याने दगडफेकीची घटना संग्रामपूर तालुक्यातील टुनकी येथे शनिवारी रात्री १० वाजेच्या सुमारास घडली. त्यामध्ये दोन्ही गटातील ७ ते ८ जण जखमी झाले, त्यातील २ ते ३ जणांची प्रकृती गंभीर आहे. घटनेची माहिती प्राप्त होताच सोनाळा ठाण्याचे ठाणेदार चंद्रकांत पाटील यांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थितीवर नियंत्रण मिळवले. तसेच जळगाव जा. पोलिस ठाण्यातील पोलिसांसह दंगा काबू पथकाला पाचारण करण्यात आले. सध्या तेथे तणावपूर्ण शांतता आहे. आठ आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले. इतर आरोपींची धरपकड सुरू आहे. याप्रकरणी सोनाळा पोलिस ठाण्यात परस्पर विरोधातील फिर्यादीवरून ४१ जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले. याप्रकरणी सोनाळा पोलिस ठाण्यात सुरेश तात्या कोष्टी यांनी तक्रार दिली. त्यानुसार एका गटातील २९ जणांवर भादवि कलम १४३,१४७,१४९,३३७, ४२७, १३५ मपोका अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले. तसेच शेख शोयब शेख युसूफ याच्या तक्रारीवरून १६ आरोपींवर गुन्हा दाखल केला आहे.

# सिंदखेडराजा शहरात ८१.१३ टक्के मतदान

जनसंचलन/ सिंदखेडराजा



बुलढाणा लोकसभेसाठी सिंदखेडराजा शहरातून एकूण १३६२५ माता पैकी ८११३ मतदान झाले असून या मतदानाची टक्केवारी ८१.१३ टक्के आहेत. २६ एप्रिल रोजी सिंदखेडराजा शहरात लोकसभेसाठी शांततेत मतदान पार पडले. या मतदानामध्ये एकूण १३६२५ मतदारांपैकी ८११३ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. या मतदानाची टक्केवारी ८१.१३ टक्के असून भूतनिहाय मतदान पुढील प्रमाणे मतदान केंद्र क्रमांक २२८ एकूण मतदान १४३१ झालेले मतदान ८९५ टक्केवारी ६० टक्के केंद्र क्रमांक २२९ एकूण मतदान १२६८ झालेले मतदान ६८७ मतदानाची टक्केवारी ५३.७९ टक्के मतदान केंद्र क्रमांक २३० एकूण मतदान १२३६ झालेले मतदान ७१० मतदानाची टक्केवारी ५७.९१ मतदान केंद्र क्रमांक २३१ एकूण मतदान १५०९ झालेले मतदान ८६६ मतदानाची टक्केवारी ५७.३९ मतदान क्रमांक २३२ एकूण मतदान संख्या ११७१ झालेले मतदान ७५० मतदानाची टक्केवारी ६४.५ मतदान केंद्र २३३ एकूण मतदान १४०९ झालेलं मतदान ८७८ मतदानाची टक्केवारी ६२.३१ टक्के मतदान केंद्र क्रमांक २३४ एकूण मतदान संख्या १२३६ झालेले मतदान ८४० मतदानाची टक्केवारी ६७.९६ मतदान क्रमांक २३५ एकूण मतदान १४५० झालेले मतदान ९१३ मतदानाची टक्केवारी ६२.९७ मतदान केंद्र क्रमांक २३६ एकूण मतदान १५१६ झालेले मतदान ९२७ मतदानाची टक्केवारी ६१.१५ केंद्र क्रमांक २३७ एकूण मतदान १३०९ झालेले मतदान ६४७ मतदानाची टक्केवारी ४९ टक्के सिंदखेडराजा शहरातील सर्वात जास्त २३४ या मतदान क्रमांकावर ६७.९६ टक्के मतदान झाले असून सर्वात कमी २३७ केंद्र क्रमांक यावर ४९.४३टक्के मतदान झालेले आहेत. यामध्ये एकूण १३६२५ मतदारांपैकी ८ हजार ११३ मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला या मतदानाची टक्केवारी ८१.१३ टक्के असून या सर्व मतदारांनी भावी खासदार कोण होणार याचं भवित्य भवितव्य मतपेटीत बंद केले आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# शिंदे यांच्या कार्यपद्धतीने प्रभावित, अंबरनाथ काँग्रेसचे शहराध्यक्ष ७ माजी नगरसेवकांसह शिवसेनेत...

वृत्तसंस्था/ ठाणे

अंबरनाथमधील काँग्रेसचे शहराध्यक्ष आणि माजी विरोधी पक्षनेते प्रदीप पाटील यांनी रविवारी ७ माजी नगरसेवकांसह शिवसेनेत प्रवेश केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब आणि कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्र्यांच्या ठाणे निवासस्थानी प्रदीप पाटील यांनी शिवसेनेत प्रवेश केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या कार्यपद्धतीने प्रभावित होऊन आपण शिवसेनेत प्रवेश करत असल्याची प्रतिक्रिया यावेळी प्रदीप पाटील यांनी दिली. प्रदीप पाटील हे १९९५ पासून अंबरनाथ नगरपालिकेचे नगरसेवक असून माजी विरोधी पक्षनेते सुद्धा राहिले आहेत. अंबरनाथ शहरात प्रदीप पाटील यांनी मागील अनेक वर्षे काँग्रेसची एकहाती धुरा सांभाळली. मात्र आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांच्या धडाकेबाज कार्यपद्धतीने प्रभावित होऊन आपण शिवसेनेत प्रवेश करत असल्याचे प्रदीप पाटील यांनी सांगितले.प्रदीप पाटील यांच्यासह माजी नगरसेविका अर्चना रसाळ, चरण रसाळ, माजी नगरसेवक सुरेंद्र यादव, बबन तांबे, मनोज देवडे,



बिस्मिल्ला शेख, काँग्रेसच्या महिला शहराध्यक्षा स्मिता बंगेरा, नयना पवार, विद्या नागदिवे, अर्चना प्रसाद, मनीषा परमल, युथ काँग्रेसचे हर्षल भोईर, देवराज अल्झानडे, संकेत तांबे, आशिष डुबली ईशान जाधव, अश्फाक खान, अल्पसंख्यांक सेलचे शहराध्यक्ष नईम शेख यांच्यासह सुधीर जाधव, ज्ञानेश्वर शेलार, अनिल कांबळे, प्रशांत उतेकर हे प्रमुख पदाधिकारी तसेच शेकडो काँग्रेस कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी त्यांचे शिवसेनेत स्वागत केले. आगामी काळात पूर्ण ताकदीने शिवसेनेचे काम करणार असल्याची प्रतिक्रिया यावेळी प्रदीप पाटील यांनी दिली. तर प्रदीप पाटील यांचे शिवसेनेत स्वागत करत असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांनी याप्रसंगी सांगितले.

# प.पू.शुकदास महाराजांनी माळरानावर ज्ञानगंगा अवतीर्ण केली - डॉ.पानझाडे

जनसंचलन/हिवरा आश्रम

भगीरथाने प्रयत्नांची पराकाष्टा करून लक्षावधी जीवांना तसेच पशू पक्षी व निसर्ग यांना जीवन देणाऱ्या गंगेला अवतीर्ण केले अशी अख्यायिका आहे. त्याचप्रमाणे प. पू. शुकदास महाराजांनी ग्रामीण भागातील, तळागळातील उपेक्षित आणिवंचितांचे जीवन समृध्द व शहाणे करण्यासाठी उजाड आणि निर्मनुष्य माळरानावर ज्ञानगंगाअवतीर्ण केली व लाखो विद्यार्थ्यांना ज्ञानरूपी जीवन बहाल केले, असे उद्गार महाराष्ट्र राज्याचे शिक्षण उपसंचालक डॉ. श्रीराम पानझाडे पुणे यांनी विवेकानंद आश्रमास भेटी प्रसंगी काढले. शिक्षण व ज्ञान ही सर्वोच शक्ती आहे. त्यामुळेचमानवीजीवनालाअर्थप्राप्तहोतो. शिक्षणासोबत स्वावलंबन, सदाचार या मूल्यांना प्राधान्य देत आल्यामुळे या संस्थेच्याशाळा व महाविद्यालयाची प्रगती झाली. शिक्षणाला व्यवसायाचे रूप न येवू देता. ती सेवा आहे व या सेवेचे व्रत आपण स्विकारले आहे. अशी भूमिका प्रत्येक शाळेने घेतल्यास विद्यार्थ्यांना



अपेक्षीत मुलभूत भौतिक सोयी सुविधांची कमतरता पडणार नाही, असे विचार त्यांनी यावेळी व्यक्त केले. आश्रमात आगमन प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष आर. बी. मालपाणी यांनी त्यांचेपुष्पगुच्छ व ग्रंथ देवून स्वागत केले. संस्थेच्या सर्व सेवा उपक्रमांना यावेळी त्यांनीभेट दिली. विवेकानंद स्मारक हे पर्यटकांसाठी मिनी कन्याकुमारी आहे. याठिकाणी आल्यानंतर विवेकानंदांच्या दिव्य विचारांची, त्यांच्या तत्वज्ञानाची प्रेरणा प्रत्येकाच्या अंर्तमनाला स्पर्श करून जाते. आश्रमाने केलेले निसर्गाचे संवर्धन त्यामुळे नजरेस पडणारी हिरवी झाडी परिसराची स्वच्छता आणि निळाशार जलाशय अत्यंत नयनरम्य आहे. शिक्षणातील मुलींचा टक्का वाढविणे गरजेचे आहे. शाळा बाह्य मुले शोधणे व त्यांना शैक्षणिक प्रवाहात आणणे तसेच मराठी शाळा टिकून राहणे हे शिक्षण विभागासमोरील मोठे आव्हान आहे. परंतु शिक्षण क्षेत्रातीलसर्व संस्था, शिक्षक, पालक व समाजातील सर्व घटक हे आव्हान पेलण्यासाठी सज्ज व सक्षमआहे असे विचारही त्यांनी यावेळी बोलतांना व्यक्त केले. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष अशोक थोरहाते, विश्वस्त कैलास भिसडे, प्राचार्य आर. डी. पवार, प्रा. गणेश चिंचोले इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# कुठे पाना तर कुठे बाण, शहरी भागात मशालीची चर्चा







जनसंचलन/बुलढाणा

निवडणूक शांततेत पार पडली. लोकांनी उमेदवारांची गणिते मांडायला सुरवात केली. शहरी भागात मशाल चालली असल्याची चर्चा जागोजागी सुरु होती. तर ग्रामीण भागात पाना, धनुष्यबाण, मशाल चालल्याची चर्चा सुरु आहे. बुलडाणा लोकसभा मतदार संघात २०२४ च्या निवडणूक रंगणात २१ उमेदवार उभे होते. यात प्रमुख लढत होती ती शिवसेना उमेदवार प्रतापराव जाधव, (उबाठा) गटाचे नरेंद्र खेडेकर यात रंगत आणली ती शेतकरी नेते रविकांत तुपकर यानी २६ एप्रिल रोजी मतदान पार पडले आणी राजकीय अंदाज काढायला सुरवात झाली. लोणार तालुक्याचा विचार केला तर शहरात मशाल, धनुष्यबाण, वंचित व पाना असे समिश्र प्रतिसाद मतदारांनी दिले. पण ग्रामिण भागाचा विचार केला तर पानाला मतदारांनी मतदान केल्याची चर्चा जोरात सुरु होती. तर धनुष्यबाण व मशाल ही प्रत्येक गावात कमी-जास्त प्रमाणात चालल्याने राजकीय अंदाज काढणे गांवोगावी सुरु होते. असे जरी असले तरी जे शिवसेनेचे हक्काचे मतदान होते. त्या गावात पाना चालल्याने याचा फायदा नेमका कुणाला होतो हे मतपेट्यातुन ४ जूनला बाहेर येईल पण घाटाखाली घाटावर चर्चा मात्र जोमात सुरु झाल्याचे चित्र गावोगावी पाहायला मिळते. एकूण परिस्थिती पाहता समिश्र मतदान झाल्याने अंदाज काढणे सुरू आहे पण नागरिकांच्या चर्चाना पूर्णविराम ४ जूनलाच बसणार एवढे मात्र खरे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958